जॉर्ज फेरिसचा


आकाश पाळणा

लेखिका: मोनिका कुलिंग   चित्रे: जीन बरेटा

मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक




जॉर्ज फेरिसचा
आकाश पाळणा




लेखिका: मोनिका कुलिंग चित्रे: जीन बरेटा
मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक


जॉर्जला गोल गोल फिरणारी पाण्याची चक्की पाहायला खूप आवडे. त्या पाणचक्कीमुळे माणसांना-जनावरांना प्यायचे पाणी मिळायचे, शेतांना शिंपण घालता यायचे, मक्याचे पिक पिकवता यायचे. गरगर फिरणाऱ्या चक्कीच्या चाकाचा आवाज जॉर्जला खूप आवडायचा.



१८६७ साल होते. नेवाडामध्ये जॉर्ज वॉशिंग्टन गेल फेरिस ज्युनिअर एका मळ्यात राहत होता. तो घोडेस्वारी करायचा.




तिथे तो लहान-सहान कामे करायचा. बाजूला असलेली पाणचक्की फिरत असायची.






कार्सन नदीवर बसवलेली पाणचक्की वर्षाचे बारा महिने चालूच असायची. पाणचक्कीचे फिरणारे चाक पाहतच जॉर्ज लहानाचा मोठा झाला.


वयाच्या चौदाव्या वर्षी शिक्षणासाठी जॉर्जला घर सोडावे लागले. कॉलेजमध्ये त्याने इंजिनिअरींगची पदवी घेतली. तो आता पूल, कालवे, धरणे, रस्ते ह्यांच्या बांधकामाचे आराखडे बनवण्याचे काम करू लागला.






जॉर्ज पिट्सबर्ग, पेन्सिल्वेनिया ह्या शहरात राहायला आला. तिथे त्याला त्याच्या आवडीचे आलुगेनी नदीवरील पुलाच्या बांधकामाचे काम मिळाले.

कामगार जेव्हा “जॉर्जच्या” पुलाचे बांधकाम करत होते तेव्हा देखरेख करण्यासाठी कधीकधी तो सेलला, आपल्या लाडक्या कुत्र्याला सोबत घेऊन येई.



१८८६ साली जॉर्जने मार्गारेटशी लग्न केले. त्याने स्वत:चा व्यवसाय सुरु करण्याचा निर्णय घेतला आणि “जी. डब्लू. जी. फेरिस आणि कंपनी” सुरु केली. “आता काहीतरी हटके काम करता येईल.” जॉर्ज म्हणाला. मार्गारेटनचा त्याला पाठिंबा होताच. आणि सेलनेही भुंकून आपली सहमती दर्शवली.






१८९२ साल होतं. पुढच्याच वर्षी म्हणजे १८९३ मध्ये शिकागोत जगातील सर्वात मोठी जत्रा भरणार होती. त्यासाठी इंजिनीअर्सची इच्छा होती की आपण फ्रान्समधल्या आयफेल टॉवरसारखे काहीतरी भव्यदिव्य आणि लक्षणीय असे काहीतरी तयार करावे. त्याबद्दल वर्तमानपत्रात छापून आलेले मार्गारेटच्या नजरेस पडले. “जॉर्ज, हे बघ, तिथे आव्हानात्मक स्पर्धा आहे. मला वाटतं तू ह्यात सहभागी व्हावंस” ती म्हणाली.

मार्गरेटने जॉर्जच्या सामानाची बांधाबांध केली. इतर इंजिनिअर्ससोबत काम करण्यासाठी त्याने शिकागोला जाण्यासाठी ट्रेन पकडली.






डॅनियल बर्नहम हे त्या भव्य जत्रेच्या इमारतींचे प्रमुख होते. तिथल्या प्रत्येकाला भलामोठा टॉवर बांधावासा वाटत होता. आपल्याला इथे दुसरे पॅरिस उभे करायचे नाही ह्यावर ते ठाम होते. जॉर्ज मात्र शांतपणे एका कोपऱ्यात कागदावर कसलीतरी चित्रे रेखाटण्यात रमला होता.

मि. बर्नहमनी त्याचे रेखाटन पाहिले. “ह्या फिरणाऱ्या चाकामध्ये लोकांना बसता येईल,” जॉर्ज त्यांना म्हणाला. “ह्यात बसून उंचावरून पूर्ण जत्रा आणि लेक मिशिगन असे सभोवतालचे सुंदर दृश्य लोक पाहू शकतील.”

“हे कसे शक्य आहे?” मि. बर्नहम म्हणाले.

बाकीच्यांनीही त्याला “काहीही बोलतोस..” म्हणत वेड्यात काढले.





मि. बर्नहमनी तीन वेळा त्याची कल्पना धुडकावून लावली.

“वाऱ्यामुळे चक्र तुटून त्याचे पार तुकडे होतील आणि लोक जमिनीवर फेकले जातील. काहीतरी चांगली कल्पना घेऊन ये,” त्यांनी सुनावले.

दिवस भराभर निघून जात होते. कुणालाच काही हटके सुचत नव्हते. शेवटाला मि. बर्नहमनी जॉर्जला चक्र बनवण्याची परवानगी दिली. पण त्यासाठी त्यांनी अट घातली की ह्यासाठी लागणारा पैसा जॉर्जला स्वत:च्या खिशातून घालावा लागेल तसेच हे चक्र जत्रेच्या उद्‌घाटनाच्या दिवशी म्हणजे १ मे १८९३ ला तयार असले पाहिजे.






तो बँकांकडे गेला परंतु सगळ्यांनी त्याला कर्ज द्यायला नकार दिला. त्याच्या पाठीमागे कसली खुळचट कल्पना आहे असे म्हणत हसत होते.









जॉर्जच्या मदतीसाठी मित्र सरसावले. ह्या कामासाठी जॉर्जला चार लाख डॉलर हवे होते. त्यासाठी मित्रांनी एका धनवान माणसाला तयार केले. तेव्हा कुठे कामाला सुरुवात झाली.




जॉर्जला ह्या फिरत्या पाळणाचक्राला “मॉनस्टर व्हील/आकाश चक्र” असे नाव द्यायचे होते. परंतु सगळ्यांनी त्या नावाला विरोध केला. त्याऐवजी सगळे “फेरिस व्हील” म्हणू लागले.






जानेवारीच्या कडाक्याच्या थंडीत खोदकाम सुरु झाले. त्या वर्षी मागच्या अनेक वर्षातील निच्चांकी तापमानाची नोंद झाली होती. सुरुंग लावून कामगारांना बर्फ फोडावा लागला.


पाया भक्कम व्हावा म्हणून आठ खड्डे खणले. त्यात सिमेंटने भरले. मजबूत पाया फार महत्वाचा होता कारण त्याला वीस लाख पौंडाचे वजन पेलायचे होते.




पायासाठी लागणारे जड सामान मालगाडीने वाहून नेण्याचे जॉर्जने ठरवले. त्यासाठी तात्पुरते ट्रेनचे रूळ उभारले.




मधल्या आसाचे वजनच निव्वळ सत्तर टन होते. एवढा महाकाय स्टीलचा गोळा ठोकण्याची ही अमेरिकेतील पहिलीच घटना असावी.






एकेक निमुळता त्रिकोण जोडून चक्र तयार करायला सुरुवात केली. शेवटचा त्रिकोण जोडायचा दिवस आला तेव्हा तो तंतोतंत बसेल ना अशी धाकधूक सगळ्यांच्या मनात होती. पण आपण केलेले मापाचे गणित बरोबर आहे ह्याची जॉर्जला खात्री होती.


आणि तसेच झाले. जॉर्जचे गणित अगदी बरोबर होते. शेवटचा त्रिकोण चपखल बसला.






जत्रा सुरु झाली पण तरीही चक्राचे काम पूर्ण झाले नव्हते. अजून त्यावर स्टीलचे डब्बे बसवण्याचे काम बाकी होते. प्रत्येक डब्ब्यात साठ लोक मावू शकतील इतकी क्षमता होती.

१० जूनला डब्बे जोडण्याचे काम सुरु झाले. जेव्हा सगळे डब्बे जोडले गेले तेव्हा ते चक्र अगदी पाणचक्कीसारखे दिसू लागले. अगदी तशीच पाणचक्की जी लहानगा जॉर्ज तासनतास भान हरपून पहायचा.





२१ जूनला फेरिस व्हील जवळ भरपूर गर्दी जमा झाली. जॉर्जने भाषण केले आणि शिटी वाजवली

फेरिस व्हीलमध्ये पहिल्या फेरीत बसण्याचा मान आणि अनुभव घेण्यासाठी लोक उत्सुक होते.



जॉर्ज, मार्गारेट आणि सेल एका डब्ब्यात चढले. त्यांच्यासोबत शिकागोचे मेयरही चढले.





चाळीस वादकांचा ऑर्केस्ट्रा एकत्र एका डब्ब्यात चढला.


आणि हळूहळू ते भले मोठे चक्र फिरू लागले.




चक्राने एक गोल फेरी मारली आणि वरच्या टोकाला जाऊन थांबले. तिथून सभोवतालचे मनोहारी दृश दिसत होते. मार्गारेटने जॉर्जचे अभिनंदन केले. ऑर्केस्ट्राच्या वादकांनी “अमेरिका, द ब्युटीफुल” ह्या गाण्याची धून वाजवली. मग परत चक्र सुरु झाले. कैंस्ट्रा

जॉर्जचे हे विशाल चक्र २६४ फुट उंचीचे होते. आता आधुनिक फेरिस व्हील्स ह्यापेक्षा कितीतरी पटीने मोठे असतात.

लास वेगासमधील हाय रोलर जॉर्जच्या ह्या विशाल चक्रापेक्षा दुप्पट मोठे आहे.





२०१५ साली न्यूयॉर्क शहरात देशातील सर्वात उंच फेरिस व्हील/ आकाश चक्र बनवण्याचे काम सुरु झाले. त्याची उंची जवळ जवळ ६०० फुट होती.

इतक्या उंचीवरून दिसणारे दृश्यही तेवढेच अद्‌भुत दिसेल जितके ते जॉर्जच्या पहिल्या फेरिस व्हीलवरून दिसले होते.

समाप्त